मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका
कार्यालय पोलीस अधीक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

जा.क्र.:–4420
दिनांकः– 16/07/2020

अ.क्र. 27 दिनांक 29.06.2020 ते 03.07.2020 (भाग 1 ते 5)

# भाग –1

(नियुक्ती,बदली,पदोन्नती,निवृत्त आदेश) निरंक

# भाग 2

1) क्रमांकःनाजिग्रा/डी–4/सपोनि–चवरे/वैघकीय रजा/2020–4227 नागपुर, दिनांक :– 03/07/2020

महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम 1981 मधील नियम क्रमांक 50 व 61 च्या तरतुदीनुसार सपोनि.अमृता चवरे,नेमणुक पोस्टे.कळमेश्वर यांचा रजेचा कालावधी खालीलप्रमाणे मंजुर करण्यांत येत आहे.

दि.22/03/2020 ते 05/05/2020 पर्यंत 45 दिवस परावर्तीत रजा
दि.06/05/2020 ते 05/06/2020 पर्यंत 31 दिवस अर्जित रजा

2)क्रमांक :नाजिग्रा/डी–4/पोउपनि–चांदेकर/सिक कालावधी/2020–4224 दिनांक :– 03/07/2020

महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम 1981 मधील नियम क्रमांक 50 च्या तरतुदीनुसार पोउपनि.मधुकर चांदेकर,प्रभारी श्वान पथक,नागपूर ग्रामीण यांचा दि. 05/05/2020 ते 30/06/2020 पर्यंत 57 दिवसांचा सिक कालावधी अर्जित रजेत मंजुर करण्यांत येत आहे.

3) क्रमांकःनाजिग्रा/डी–4/सपोनि–बावचे/सिक कालावधी/2020–4226 दिनांक :– 03/07/2020

महाराष्ट्र नागरी सेवा(रजा) नियम 1981 मधील नियम क्रमांक 61 च्या तरतुदीनुसार सपोनि.अश्विनी बावचे,नेमणुक पोस्टे. कळमेश्वर यांचा दि.28/03/2020 ते 30/04/2020 पर्यंत 34 दिवसांचा सिक कालावधी परावर्तीत रजेत मंजुर करण्यांत येत आहे.

4)क्रमांकः नाजिग्रा/डी–4/पोउपनि–दुबे/रजा/2020–4225 नागपूर दिनांक : 03/07/2020

पोउपनि .मनिष दुबे,नेमणुक पोस्टे.कळमेश्वर हे वरिष्ठांना कोणतीही सुचना न देता किंवा कोणतेही अनफीट सर्टिफिकेट सादर न करता परस्पर स्टेशन डायरीमध्ये नोंद घेवुन दि. 03/10/2019 रोजी सिक रजेवर रवाना झाले.तसेच प्रदीर्घ 216 दिवसांच्या सिक कालावधीत वेळोवळी पोस्टेला कोणतेही अनफिट सर्टिफिकेट सादर केले नाही. कर्तव्यावर हजर होतांना फक्त अनफिट व फिट सर्टिफिकेट सादर केले.प्रदिर्घ 216 दिवसांच्या सिक कालावधीचे उपचाराचे कोणतेही वैघकिय कागदपत्रे सादर केलेली नाहीत.करीता त्यांचा दि.03/10/2019 ते 05/05/2020 पर्यंत 216 दिवसांचा कर्तव्यावरून अनुपस्थित कालावधी बिनपगारी रजेत मंजुर करण्यांत येत आहे.

5) क्रमांकःनाजिग्रा/डी–7/सुधारीत वेतन निश्चीती/7 पे/2019–4192 दिनांक :– 30/06/2020

श्रीमती माधुरी पांडे,क.श्रे.लि.नेमणुक पोलीस अधिक्षक,नागपूर ग्रामीण नागपूर यांनी,अप्पर पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे निकालपत्र क्रं. पत्र क्रं. प्रशिक्षण/परीक्षा/पीआरटी–सुपरवायझरी परिक्षा/115/2019 दि. 03/04/2020 अन्वये सेवाप्रवशोत्तर परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे.

श्रीमती माधुरी पांडे,क.श्रे.लि.यांनी 03 संधीमध्ये सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण न केल्यामुळे कार्यालयीन आदेश क्र. नाजिग्रा/डी–7/वार्षिक वेतनवाढ स्थगीत करण्यांत आली होती. त्यांनी पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे निकालपत्र क्र.

प्रशिक्षण/परिक्षा/पीआरटी–सुपरवायझरी परिक्षा/115/2019 दि. 03/04/2020 अन्वये श्रीमती माधुरी पांडे,कश्रेलि यांनी सेवाप्रवशोत्तर परिक्षा उत्तीर्ण केल्याने त्यांची खालील प्रमाणे वेतननिश्चीती करण्यांत येत आहे.

क.श्रे.लि. वेतन श्रेणि रू. 5200–20200 ग्रेड वेतन रू. 1900/–

7 वे वेतन आयोगानुसार नियमित पदातील वेतनवाढ

| सध्या घेत असलेले वेतन,दिनांक व वेतनस्तर | देय ठरणारे वेतन,दिनांक व वेतनस्तर |
|---|---|
| रू.26,000/–दि.01.07.2018(एस–6)<br>रू.26,000/–दि.01.07.2019(एस–6)<br>(सेवा प्रवेशोत्तर परिक्षा तिन संधीत उत्तीर्ण केली नसल्याामुळे वेतनवाढ स्थगीत करण्यात आलेली आहे.) | रू.26,000/–दि.01.07.2018(एस–6)<br>रू.26,800/–दि.01.07.2019(एस–6)(काल्पनिक)<br>(सेवा प्रवेशोत्तर परिक्षा तिन संधीत उत्तीर्ण न झाल्याने काल्पनिक राहील.)<br>रू.26,800/–दि.03.04.2020(एस–6)(देय राहील)<br>(सेवा प्रवेशोत्तर परिक्षा दि.03.04.2020 रोजी उत्तीर्ण झाल्याने देय.<br>रू. 27,600/–दि.01.07.2020(एस–6) |

## भाग –3

क्रमांकः नाजिग्रा/डी–10/वि.चौ./निलंबन मुक्त/2020–4204 नागपूर दिनांक : 01/07/2020

पोलीस अधिक्षक,नागपूर जिल्हा,ग्रामीण नागपूर आस्थापनेवरील गठीत करण्यांत आलेल्या निलंबन आढावा समीतीने दिनांक 30/06/2020 रोजी निलंबित असलेल्या सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे निलंबनाचा आढावा घेतला असता त्यामध्ये मा.पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक पोमंस/11/22/6/252/2012,दि. 10.02.2016 मध्ये दिलेल्या मार्गदर्शक सुचना प्रमाणे निलंबित असलेल्या खालील नमुद पोलीस अधिकारी/कर्मचा–यांना त्यांच्या विरूध्द सुरू असलेल्या न्यायालयीन कार्यवाहीच्या अंतिम निर्णयाच्या आधिन राहुन त्यांना निंलबनातुन मुक्त करण्याचे निर्देश असल्याने त्यांना निलबंनातुन मुक्त करून ते कर्तव्यावर हजर झालेल्या तारखेपासुन त्यांना पुनःस्थापीत करण्यांत येत असुन त्यांची नेमणुक त्यांचे नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी करण्यांत येत आहे.तसेच त्यांचे निलबंन कालावधीबाबतचा निर्णय त्यांचे विरूध्द सुरू असलेल्या प्राथमिक चौकशी/विभागीय चौकशीचा अंतिम निर्णय झाल्यानंतर घेण्यात येईल.

| अ.क्र | हुघा/नांव | निलंबनातुन मुक्त केल्यानंतर नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|
| 1 | पोहवा/506 भोजराज तांदुळकर | पोलीस मुख्यालय |

क्रमांकः नाजिग्रा/डी–15/अंतिम आदेश/मनापोशि/2020–4222 नागपूर दिनांक : 02/07/2020

मनापोशि/13 तेजस्वीनी कावळे सध्या नेमणुक पोलीस स्टेशन मौदा,नागपूर जिल्हा ग्रामीण येथे नेमणुकीस असतांना दिनांक 10/02/2020 रोजी 09:00 ते 21:00 विधानसभेचे मतमोजणी झालेले ईव्हीएम मशिन ठिकाणी गार्ड डयुटी वरून गैरहजर होते या प्रकारची कसुरी केलेली होती.

सदर कसुरीबद्दल आपल्याकडुन भविष्यात पुन्हा या प्रकारची चुक होणार नाही या बाबतची समज देवुन''सक्त ताकीद'' ची शिक्षा देण्यात येत आहे.

## भाग –4

(बक्षिस आदेश) निरंक

## भाग –5

निरंक

(संजय पुरंदरे)
प्रभारी पोलीस उप अधिक्षक (मुख्या.)
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर.

प्रति,

सर्व ठाणेदार/रापोनि. मुख्या./बि.संदेश/जि.वि.शा./नियं.कक्ष/स्था.गु.शा./मो.प.वि./पो.अधि.वा.शाखा/अ.पो.अधि.वा.शाखा/म.त.नि/कार्या.अधिक्षक/डी–4/डी–7/डी–9बी/डी–11/डी–12/डी–13/लघुलेखक/वे.नि.
लिपीक/कल्याणशाखा/सुरक्षा शाखा/वाहतुक शाखा ना.ग्रा.

प्रत सस्नेह अग्रेषित :– अ.पो.अधि.नाग्रा/महामार्ग सूरक्षा पथक/नागरी हक्क संरक्षण केंद्र.

प्रतिलिपी :– पो.उप अधि.(गृह) व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी ना.ग्र. यांना आवश्यक कार्यवाहीस

2/– सदरची मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका ही रोलकॉलवर वाचून दाखविण्यात यावी व संबंधितास समज देऊन त्यांचा नावापूढे त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.